**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-१ गुरूवार दिनांक १७/४/२००८

ठराव क्रमांक -१ गुरूवार दिनांक १७/४/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगपालिकेचे आरोग्य विभागाकरिता घनकचरा व्यवस्थापने अतंर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून कचरा वाहतुकी करिता मनपाने पुरविलेल्या टाटा अेसीई चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधणे,टाटा ११०९चेसीवर डंपर प्लेसर बसविणे,२.५ क्युबीक मीटर क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय-१२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीमधून घनकचरा व्यवस्थापनेतंर्गत प्राप्त निधीमधून आरोग्य विभागाकरिता खरेदी करण्यात आलेल्या टाटा असीई टाटा ११०९ वाहनांवर हायड्रो.बदिस्त बॉडी बांधणी करणे तसेच २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कंटेनर बनविणे बाबत.

मा.सादर.

अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून वाहने खरेदी करण्यात आलेली असून महानगरपालिकने पुरविलेल्या चेसीवर कचरा वाहतुकीकामी बॉडी बांधकाम करणे तसेच कचरा कंटेनर बनविणे करिता जाहीर फेरनिविदा चौथ्यांदा दै.सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येवून सदरच्या निविदा मा.उपायुक्त (कर),यांचे दालनात निविदाकार,मुख्य लेखापरिक्षक,मेकॅ.इंजिनिअर यांचे समवेत उघडणेत येवून तुलणात्मक तक्ता केला असता.

**अ)** टाटा असीई वाहनावर हायड्रो. बॉडी बांधकाम करणे.-१५ नग कायझेन इंटरप्राईजेस यांचे निविदेप्रमाणे रू.९७,९९९/- प्रत्येकी नुसार रू.१४,६९,९८५/-

**ब)** टाटा ११०९ चेसीवर डंपर प्लेसर बांधणी करणे - २ नग आवटे फॅब्रीकेटर्स व ऑटोमो वर्क्स यांचे निविदेनुसार प्रत्येकी रू.५,२०,०००/- प्रमाणे रू. १०,४०,०००/- तसेच.

**क)** २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कचरा लोखंडी कंटेनर २०नग बनविणे कामी रू.३५,०००/- प्रत्येकी प्रमाणे रू.७,००,०००/- एरॉस मेटल यांचे निविदेप्रमाणे खर्च येईल.

वरील तिनही कमीचे निविदाधारक असून निगोशिएशन मध्ये त्यांनी दर कमी केलेले नाहीत. सदरचा खर्चाचा प्रस्तावास मा.निविदा छाननी समितीने शिफारस केलेली असून,टाटा अेसीई वाहनावर हायड्रो. बंदीस्त बॉडी बांधकाम टाटा ११०९ चेसीवर डंपर प्लेसर बांधणी तसेच २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे लोखंडी कचरा कंटेनर बांधणी करणे कामी रू.३२,०९,९८५/- चे खर्चास व कामास तसेच सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरी करिता पाठविणेस मंजूरी घेण्यात येवून प्रस्ताव पुढील निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे सादर.

येणे प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगपालिकेचे आरोग्य विभागाकरिता घनकचरा व्यवस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून कचरा वाहतुकी करिता मनपाने पुरविलेल्या टाटा एसीई चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधणे,टाटा ११०९चेसीवर डंपर प्लेसर बसविणे,२.५ क्युबीक मीटर क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा .

मॅके.इंजि. श्री निकम पी.जे.:- टाटा ४०७ या वाहनाचे चेसीवर बंदीस्त बॉडी बांधकाम करणे कामीचे निविदा दरास मा.स्थायी समिती सभेने दिनांक २५/३/२००८ रोजीचे सभेत मंजूरी दिलेली आहे. आजचे सभेचे विषय पत्रिकेवर टाटा ४०७ चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधणेचा केलेला उल्लेख हा चुकीचा झालेला आहे.

मा.श्री शिंदे द.बा. :- त्या बाबतची चुकीची दुरूस्ती करावी.

मा.सभापती साहेब :-टाटा ४०७वाहनाचा उल्लेख चुकीने झालेला असून अजेंडयावर दुरूस्ती केली आहे.

मा.श्री तिवारी सु.र.:-१२ व्या वित्त आयोगा अंतर्गत आता काय काम करून घ्यावयाचे आहे.त्याची महिती द्यावी

मॅके.इंजि.श्री निकम पी. जे.- मनपाने पुरवलिेल्या टाटा एसीई वाहनावर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधणे, टाटा ११०९ चेसीवर डंपर प्लेसर बसविणे तसेच २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे अशी कामे करावयाची असून मा.स्थायी समितीचे मंजूरी नंतर वर्क ऑर्डर देवून सदर कामे पूर्ण करून घेणे आहेत.

मा.श्री तिवारी सु.र.:- सदर कामासाठी चारवेळा निविदा दर मागविल्याने कामास उशीर झाला आहे. सदर कामांचे ठेकेदारांचे डिपॉझीट आपले कडेस आहेत.

मा.श्री शिदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा वर्क ऑर्डर देवून काम पूर्ण करून घेणे आहेत आपण मंजूरी द्यावी.

मा.श्री तिवारी सु.र. व मा.श्री शिंदे द.बा :.- किती वाहनांचे चेसीवर बंदीस्त बॉडी,बांधणेचे तसेच इतर कामे करून द्यावयाची आहेत.

मॅके.इंजि.श्री निकम पी.जे.:- टाटा एसीईच्या पंधरा चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बॉडी बांधकाम करणे, टाटा ११०९ चे दोन चेसीवर डंपर प्लेसर बांधणी करणे,अशा प्रमाणे सतरा चेसीवर तसेच २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कचरा लोखंडी कंटेनर २० नग बनविणे आहेत.

मा.उपायुक्त डॉ. श्री जावळे साहेब :- आरोग्य विभागाने आणखी नविन २.५ घनमीटर क्षमतेचे पंचवीस कचरा लोखंडी कंटेनर बनवून घेणेचा प्रस्ताव दिलेला असून त्यास त्यास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे. निधी उपलब्ध असलेने कमीचे दराचे निविदाकार यांचे कडून अतिरिक्त कचरा लोखंडी कन्टेनर मंजूर दराने बनविणेचे कामास व त्या कामी येणारे खर्चासही मंजूरी देणे बाबत मा.स्थायी समिती सभेने निर्णय यावा. त्यामुळे निविदा मागविणे विषयी व इतर प्रोसिजर पूर्ण करणे साठी वेळ जाणार नाही.

मा.श्री शिंदे द.बा.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

मा.सौ.खरपुडे ज.सु.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास व खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. तसेच आरोग्य विभागाचे प्रस्तावा नुसार अतिरिक्त पंचवीस कचरा लोखंडी कंन्टेनर बनवून घेणे कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत यावी.सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे विभागा करिता घनकचरा व्यवस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून कचरा वाहतुकी करिता मनपाने पुरविलेल्या टाटा एसीई चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधणे,टाटा ११०९ चेसीवर डंपर प्लेसर बसविणे,२.५ क्युबीक मीटर क्षमतेचे लोखंडी कंटेनर बनविणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफीस रिपार्ट पहाता.

अ) कमीचे निविदा दरधारक कायझेन एन्टरप्राईजेस यांचे टाटा एसीई पंधरा चेसीवर हायड्रोलिक सिस्टीमची बंदीस्त बॉडी बांधकाम करणेचे प्रत्येकी दर रूपये ९७,९९९/- (रूपये सत्याण्णव हजार नउशे नव्याण्णव फक्त) चे दरास व याकामी येणारे एकूण खर्च रू. १४,६९,९८५/- (रू.चौदा लाख एकोणसत्तर हजार नउशे पंच्याऐशी फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

ब) कमीचे निविदा दर धारक आवटे फॅब्रीकेटर्स व ऑटोमो वर्क्स यांचे टाटा ११०९ चे दोन चेसीवर डंपर प्लेसर बांधणेचे प्रत्येकी दर रू. ५,२०,०००/- (रूपये पांच लाख वीस हजार फक्त) चे दरास व याकामी येणारे एकूण खर्च रू. १०,४०,०००/- (रू.दहा लाख चाळीस हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

क) कमीचे निविदा दर धारक एरॉस मेटल वर्क्स यांचे २.५ क्युबीक मीटर क्षमतेचे कचरा लोखंडी कंटेनर नग वीस बनविणेचे प्रत्येकी रूपये ३५,०००/- (रूपये पत्तीस हजार फक्त) चे कमीचे दरास व याकामी येणारे एकूण रक्कम रूपये ७,००,०००/- (रूपये सात लाख फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच आरोग्य विभागाचे प्रस्तावा नुसार अतिरिक्त पंचवीस कचरा लोखंडी कंन्टेनर बनवून घेणे कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही तत्काळ करण्यांत यावी

सुचक - मा.श्री शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक - मा.सौ.खरपुडे ज.सु.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.